
# गौतमी पाटीलच्या अदांवर तरुणाई फिदा

# पण वडाळ्यासह पंचक्रोशीत चर्चेचा धूराळा वेगळाच



गेल्या कित्येक वर्षांची परंपरा असलेल्या उत्तर सोलापूर तालुक्यातील वडाळ्याच्या शेख फरीदबाबा यात्रेच्या मुळच्या रुढीला यंदा छेद देण्यात आला. कुस्त्याच्या मैदानाने येथील यात्रेची सांगता दरवर्षी होत होती. यंदा मात्र कुस्त्याचे जंगी मैदान न भरवता डीजे डान्सर गौंतमी पाटील हिच्या कार्यक्रमाने यात्रेची सांगता करण्यात आली. वास्तविक कुस्त्याचे मैदान न भरवल्याने कुस्ती शौकीन, पैलवान, उस्ताद मंडळी आदी सगळ्यांचाच हिरमोड झाला. यातून इथली कुस्ती फडाची परंपरा खंडित झाली. दुसऱ्या बाजूला नृत्यांगणा गौतमी पाटील हिच्या अदानी तरूणाईची मात्र झक्कास करमणूक झाली. मात्र गौतमी पाटील हिचा कार्यक्रम आणून बीभत्स, अंगप्रदर्शन ातून गाण्यांचा नंगानच इथं घडविला. याबद्दल गावातील महिला, मुली, यांनी नापसंती व्यक्त केली.एकूणच येथील यात्रेवरुन वडाळ्यासह पंचक्रोशीत चर्चेचा धूराळा उडाला आहे.



## ● पैलवान, उस्ताद अन् कुस्ती शौकिनांचा हिरमोड
## ● कुस्ती फडाची परंपरा खंडीत

उत्तर तालुक्यातील वडाळा येथील ग्रामदैवत हिंदू आणि मुस्लीम यांचे श्रद्धास्थान शेख फरीद बाबाची यात्रा वैशाख चतुर्थीला अत्यंत धार्मिक वातावरणात साजरी करण्याची परंपरा गेल्या अनेक वर्षांपासून चालू आहे. यंदाच्या वर्षी ही यात्रा साजरी करण्यात आली. पण कुस्त्याचा फड रद्द करुन गौतमी पाटीलचा शो आणल्याने यात्रेबद्दल वेगळाच बोलबाला सुरु आहे. भलेही गौतमी पाटीलचा शो आणला पण कुस्त्याच्या फडाची येथील वर्षांनुवर्षांची परंपरा खंडित करायला नको होती. ते तर झालेच. पण गौंतमीऐवजी इतर सांस्कृतिक कार्यक्रम ठेवला असता तर बरे झाले असते अशीही चर्चा आहे.



● बायकांच्या नाचावर लाखो उधळल्याची नाराजी

● शिस्तप्रिय अन् सभ्यतेच्या गावात अंगप्रदर्शनामधून धुडगुस घालत्याबद्दल महिला, युवतींची नाराजी

### सुज्ञ लोक म्हणताहेत काकांना हे कसे पटले?

वडाळा गावावर अद्यापही बळीराम साठे यांचे वर्चस्व आहे. ‘काका बोले अन् वडाळा डोले’ असे या गावच्या बाबतीत आहे. आक्षेपार्ह, रितरिवाज सोडून असे काही गावात होत असेल तर काकांना ते अजिबात खपत नाही. गावात काकांनी गावात चांगले वातावरण ठेवले आहे. त्यांची गावात जरब अन् दहशतदेखील आहे. काकांनी आजपर्यंत वडाळा या आदर्श गावचे नाव जिल्ह्यात,नव्हे तर महाराष्ट्रात प्रसिद्ध केले, हे असे असताना त्यांचे सुपुत्र आणि गावकारभारी सरपंच जितेंद्र साठेंनी चुकीचा निर्णय कसा काय घेतला?याबद्दलच्या चर्चेचा धुराळा उडाला आहे. यापुढे असे कार्यक्रम घेऊ नये की महिला व मुली नाराज होतील अशी ग्रामस्थांमध्ये दबक्या सुरात कुजबुज आहे. काकांनी गावात काही वेगळे होऊ दिले नाही, गावची इज्जत राखली, असाच कारभार गावचा राहावा, चुकीचे काही व्हायला नको, असे सुज्ञ नागरिक म्हणत आहे.

### पावसाचे कारण पुढे केल्याचा बोलबाला

सरपंच जितेंद्र साठे यांनी पावसाचे कारण सांगत कुस्त्याचा फड रद्द केला अशी चर्चा आहे. वास्तविक कुस्त्या ज्या दिवशी २७ मेला होत्या, त्या दिवशी पाऊस झाला नाही. त्यामुळे नियोजनाप्रमाणे कुस्त्याचा फड भरवता आला असता. त्या दिवशी नाही फड भरवता आला तर दुसऱ्या दिवशी फड भरवता आला असता. पण कुस्त्याच्या आदल्या दिवशी पाऊस आला म्हणून फड रद्द केल्याचा सोशल मीडियावर २६ मेला मेसेज फिरवला आणि पुढे गौतमी पाटीलचा कार्यक्रम ठेवला. हेच कुस्तीच्या फडासंदर्भात करता आले असते. याचा सरळ अर्थ कुस्त्याचा फड सरपंच साठे पर्यापयाने पंचकमिटीला ठेवायचा नव्हता का? असा मुद्दा उपस्थित केला जात आहे. त्यावरुन चर्चा खल येथे होत आहे.

### गौतमीचे चाहते वगळता आंनद कोणाला?

नाचणाऱ्या बायकांवर लाखो उधळणे म्हणे खटकणारे यात्रेच्या निमित्ताने, गावातील नागरिकांच्या खिशातील पैसा वर्गणीच्या रुपाने गोळा केला होता. उदार अंतकरणाने वडाळावासियांसह येथील व्यापारी, व्यावसायिक यांनी यात्रेसाठी वर्गणी दिली. यातून लाखो रुपये जमले. या पैशाचा विनियोग चांगला सांस्कृतिक कार्यक्रम, कुस्त्याचा फड यासाठी व्हायला हवा होता. तथापि, तो पैसा नाचणाऱ्या बायकांवर उडविला. तोही लाखो रुपयांची सुपारी देऊन. ही गोष्ट गौतमी पाटीलचे चाहते वगळता सर्वानाच खटकल्याचे नाव न सांगण्याच्या अटीवर अनेक नागरिक खास करुन महिलांनी ‘सुराज्य’ला सांगितले.

> “ शासन पारंपरिक कलांना प्रोत्साहन देत आहे. पण धार्मिक कार्यक्रमात असे सर्वांना न पटेल, गावातील महिला,मुली नाराज होतील असे कार्यक्रम घेऊ नये. विविध खेळांच्या स्पर्धा घेऊन गावाचा पैसा गावात राहून सर्वांगीण विकास होईल, असे नियोजन करावे.
>
> **–अजीज मणेरी, वडाळा, ता. उत्तर सोलापूर**

> “ वडाळ्यात आक्षेपार्ह काही होऊ दिले जात नाही. या गावात एक शिस्त आहे. आजवर या गावाने वेगळे काही घडू दिले नाही. पण यंदा यात्रेत खास करुन धार्मिक कार्यक्रमात पुरुषांसमोर महिला नाचण्याचा कार्यक्रम म्हणजे देवाची विटंबना आहे.
>
> **–मुमताज शेख, वडाळा, ता. उत्तर सोलापूर**

### सरपंच जितेंद्र साठेंशी संपर्क नाही

वडाळ्याच्या यात्रेसंदर्भात जे काही मुद्दे उपस्थित केले जात आहेत. जो आक्षेप घेतला जात आहे. नाराजी व्यक्त केली जात आहे. त्याबद्दल सरपंच जितेंद्र साठे यांना संपर्क साधून माहिती घेण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी फोन रिसीव्ह केला नाही. त्यामुळे त्यांच्याशी संपर्क झाला नाही. त्यांची भूमिका कळू शकली नाही.

# लोकसभा निकालाच्या खमंग चर्चेला

## जिल्ह्याला मिळणाऱ्या ‘लाल’दिव्याची तोंडीलावणी

**सोलापूर/अजित उंब्रजकर : सोलापूर आणि माढा या दोन्ही लोकसभेच्या निकालाची खमंग चर्चा जिल्ह्यात सुरु आहे. या चर्चेला आता जिल्ह्याला मिळणाऱ्या संभाव्य मंत्रीपदाच्या म्हणजेच लाल दिव्याच्या चर्चेची तोंडीलावणी लागत आहे. खासदार नाईक-निंबाळकर अन् आमदार राम सातपुतेंच्या विजयानंतर सोलापूर जिल्ह्याला मंत्रीपद शक्य आहे, असा बोलबाला भाजपच्या वर्तुळात आहे. यासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या शब्दाचा दाखला दिला जात आहे. मंत्रीपदावरुन जर-तरची गणितं अन् आडाखे बांधणीच्या चर्चेचा कार्यकर्त्यामध्ये अक्षरश: किस पडतोय.**

- नाईक-निंबाळकर अन् सातपुतेंच्या विजयानंतर सोलापूर जिल्ह्याला मंत्रीपद शक्य
- उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या शब्दाचा दिला जातोय दाखला
- जर-तरची गणितं अन् आडाखे बांधणीच्या चर्चेचा कार्यकर्त्यामध्ये पडतोय किस



सोलापूर लोकसभेच्या निवडणूक निकालाबरोबरच आता लाल दिव्याच्या गाडीची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे. निवडणुकीत कोण निवडून येणार याचा अंदाज येत नसला तरी भाजपाचे आ. राम सातपुते आणि रणजितसिंह नाईक-निंबाळकर हे जर विजयी झाले तर निश्चित सोलापूरला मंत्रिपद मिळणार असल्याची चर्चा भाजपाच्या गोटात सुरू आहे. लोकसभेच्या सोलापूर जिल्ह्यातील दोन जागा निवडून आल्यास आमदार सचिन कल्याणशेट्टी यांना मंत्री करण्याचा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शब्द दिल्याचे बोलले जात आहे.

मात्र आता या शर्यतील आमदार विजयकुमार देशमुखही येऊ शकतात, असे भाजपाचे पदाधिकारी सांगत आहेत. त्यामुळे जर- तर वर असलेली लाल दिव्याची गाडी कोणाला मिळणार याची उत्सुकता संपूर्ण जिल्हाला लागली आहे. सोलापूर लोकसभा निवडणूक अटीतटीची झाली. कोण निवडून येणार याचा अंदाज येत नसला तरी पाच आमदारांच्या ताकदीवर आ. राम सातपुते नक्की दिल्ली गाठतील असे भाजपाच्या पदाधिकाऱ्यांना वाटत आहे. शिवाय नाईक-निंबाळकरांच्या रुपाने माढ्याची जागा जिंकण्यासाठी भाजपने सुक्ष्म नियोजन केले आणि गणितं घातली. फोडाफोडी केली. त्यामुळे ही जागादेखील भाजपच्या ताब्यात येणार याची खात्री भाजपवाल्यांना आहे. या दोन्ही जागांच्या विजयाचे गणित घालून जिल्ह्याला लाल दिवा मिळणार या मुद्यावर चर्चा होत आहे.

दरम्यान, निकाल जसा जवळ येत आहे. तसे लाल दिव्याची गाडी कोणाला मिळणार याचीही चर्चा भाजपमध्ये सुरू आहे. आ. सातपुते यांची प्रचार यंत्रणा हातळण्याची जबाबदारी मतदारसंघातील प्रत्येक आमदारावर होती. तरी त्यात आ. सचिन कल्याणशेट्टी यात मात्र वरचढ दिसून आले. त्यांच्याकडेच ‘लक्ष्मी’दर्शनाच्या जबाबदारीचे अत्यंत महत्त्वाचे काम उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले होते. त्यामुळे संपूर्ण निवडणूक होईपर्यंत सर्व आर्थिक बाजू आ. कल्याणशेट्टी यांनीच सांभाळली.

वास्तविक पाहता अल्पावधीतच आमदार कल्याणशेट्टी हे फडणवीस यांचे खास बनले. आतापर्यंत त्यांच्याकडेच जिल्ह्याचे सर्व अधिकार फडणवीस यांनी दिले आहेत. त्यामुळे आ. सातपुते यांच्या विजयाची संपूर्ण जबाबदारी त्यांनी आ. कल्याणशेट्टी यांच्या खांद्यावरच टाकली होती. जर आ. राम सातपुते विजयी झाले तर कल्याणशेट्टी यांना मंत्री करण्याचा शब्दही फडणवीस यांनी दिल्याचे बोलले जाते. आ. कल्याणशेट्टी यांनीही आपल्यापरीने जोरदार प्रयत्न केले. अक्कलकोट मतदारसंघातून भाजपला मताधिक्य मिळेल असा अंदाजही आहे. मात्र दुसरीकडे आ. विजयकुमार देशमुख यांच्या शहर उत्तर मतदारसंघातून आ. राम सातपुते यांना मोठे मताधिक्य मिळेल, असे बोलले जात आहे. खुद्द काँग्रेसचे कार्यकर्तेही शहर उत्तरमध्ये काँग्रेस मागे जाणार असल्याचे सांगत आहेत. मोहोळ आणि मंगळवेढा-पंढरपूरमधून आमदार शिंदे यांना मताधिक्य मिळेल असे बोलले जात आहे. मात्र ते मताधिक्य शहर उत्तरमधील मताधिक्याएवढे नसेल अशीही चर्चा आहे. जर निवडणूक निकालात आमदार सातपुते शहर उत्तर मतदारसंघाच्या मताधिक्यावर निवडून आले तर आमदार विजयकुमार देशमुख यांचा मंत्रिपदासाठी विचार होऊ शकतो, असे देशमुख यांचे समर्थक बोलत आहेत. असे झाल्यास फडणवीस यांच्यापुढेही मंत्रिपद कोणाला द्यायचे हा पेच येण्याची शक्यता आहे. भाजपच्या आमदारांना मंत्रिपद मिळणार हा जरी जर-तरचा विषय असला तरी निकालासोबतच लाल दिव्याच्या गाडीची चर्चा मात्र आतापासूनच सुरू झाली हे नक्की.


### विधानसभेसह स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या समीकरणासाठी जिल्ह्याला मंत्रीपद


लोकसभा निवडणुकीनंतर आता चार ते पाच महिन्यात विधानसभा निवडणुका होणार आहेत. जर भाजपला सोलापूरचा अपेक्षित निकाल लागला तर निश्चित पुढील समीकरणे जुळवण्यासाठी सोलापूरला मंत्रिपद मिळेल असे बोलले जाते. गेल्या पाच वर्षाच्या कालावधीत दोन सरकार बदलले तरी सोलापूरला पालकमंत्री पद मिळाले नव्हते. राम सातपुते यांच्या विजयानंतर सोलापूरला पालकमंत्रीपद मिळेल, अशी आशा भाजपच्या कार्यकर्त्यांना लागली आहे.

# सोलापुरात विस्तारली अवयदान चळवळ

## मात्र किडनीचे ८० रुग्ण अद्याप प्रतिक्षेत

**✔ सोलापूर/दीपक शिराळकर : मेडिकल हब म्हणून नावारुपाला येत असलेल्या सोलापुरात अवयवदानाची चळवळ आता चांगलीच विस्तारत आहे. अवयवदानाचे महत्त्व नागरिकांना समजत आहे. अवयवदानाबद्दल समाजामध्ये असलेल्या अंधश्रद्धा कमी होत आहेत. त्यातून अवयदान चळवळ आता या जिल्ह्यात फोफावत आहे. राज्यातील इतर जिल्ह्याच्या तुलनेत सोलापुरातील अवयदानाची चळवळ नावारुपाला आहे. चळचळ विस्तारण्यासाठी अजून प्रबोधन होण्याची गरज आहे. दरम्यान किडणी आजाराचे साधारण ८० रुग्ण किडणी मिळण्यासाठी प्रतिक्षेत आहे.**





सध्या अवयवादानामध्ये महाराष्ट्राचा दुसरा नंबर आहे. तसेच पुणे, सोलापूर कोरोनापूर्वी अवयवदान जास्त प्रमाणात होत. कोरोनाच्या महामारीत अवयव दान कमी प्रमाणात झाली तसेंच आता पूर्वीसारखी संकल्पना रुजत आहे. सोलापुरात तीन हॉस्पिटलमध्ये अवयवदान केंद्र आहेत व किडनी प्रत्यारोपण करण्याचे मान्यता आहे.

सध्या सोलापूरमध्ये जवळपास ४०० ते ५०० रुग्ण डायलिसीस वर किडनीप्रत्यारोपणासाठी वाट पाहत आहेत. ह्या रुग्णांच्या तुलनेने अवयवदानामध्ये सोलापूर जिल्हा जरी महाराष्ट्रामध्ये पाचव्या क्रमांकावर असला तरी रुग्णांच्या तुलनेने अवयवदान फार कमी प्रमाणात होत आहे.

मागील पाच वर्षांमध्ये डॉ. निलरोहित पैके यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर जिल्हामध्ये २१ मेंदुमृत, रुग्णांचे अवयवदान झालेले आहे.

एकूण ४५ गरजू रुग्णांना अवयवदानाचा लाभ झालेला आहे. सध्या किडनीचे ८० ते १०० रुग्ण किडनीच्या प्रतीक्षेत आहेत. तरीदेखील गरजू रुग्णांचा वाढता आलेख पाहता हा आकडा फार कमी आहे.

### अवयवदान म्हणजे काय?

जेव्हा एखादा व्यक्ती किंवा त्याचा जवळचा नातेवाईक (मेंदू मृत झालेल्या व्यक्तीचा) अवयवदान करून, गरजू व्यक्तीला, ज्याला जगण्यासाठी अवयवांची गरज असते, मदत करतात. याला अवयवदान म्हणतात.

---

### अवयव दान कोण करू शकतं?

ब्रेन डेड झाल्यावर हृदयाची धडधड चालू असेपर्यंत अवयव दान करू शकतात. दान करणारी व्यक्ती निरोगी असावी. ब्रेन डेड व्यक्तीला एचआयव्ही, कैंसर, मधुमेह, किडनी आणि हृदयाचे आजार नसावेत. जन्मापासून वयाच्या ६५ वर्षापर्यंत अवयव दान केले जाते.

---

### अवयवदानाचे प्रकार कोणते?

अवयवदानाचे दोन प्रकार आहेत. जिवंत व्यक्तीकडून केलं जाणारं अवयवदान ज्याला जिवंत दाता अवयव दान म्हणतात. आणि ब्रेन डेड, मृत व्यक्तीकडून केलं जाणारं अवयवदान याला मृत दात्याचे अवयव दान असं म्हटलं जातं.

---



अवयव दानाविषयी जागरुकता निर्माण व्हावी, अवयवदान सर्वात श्रेष्ठदान आहे. अवयवदान करून मान मिळवावा. अवयवदानाबद्दल अंधविश्वास सोडावा. अवयव दान जीवाशी जोडा.

**-डॉ.निलरोहित पैके, एमडी मेडिसिन डीएम नेफ्रोलॉजी, सल्लागार नेफ्रोलॉजिस्ट आणि किडनी ट्रान्सप्लांट फिजिशियन, सोलापूर**

### जिवंत आणि मृत व्यक्ती कोणते अवयव दान करू शकतो?

मेंदू मृत झालेला ज्याला वैद्यकीय भाषेत ब्रेन डेड म्हणतात. हा रुग्ण हृदय, यकृत, किडनी, स्वादुपिंड, कॉर्निया, फुफ्फुस, त्वाचा आणि हाडांचं दान करू शकतो. तर जिवंतपणे एक किडनी, यकृत आणि स्वादुपिंडाचा भाग डोनेट करता येतो.

---

### नोंदणी कशी करता येते?

आपले अवयव दान करणे ही एक सोपी प्रक्रिया आहे. तुम्हाला ऑनलाइन प्रतिज्ञा फॉर्म भरावा लागेल आणि तुम्ही ज्या संस्थेकडे नोंदणी कराल ती संस्था तुम्हाला तुमचा युनिक नोंदणी क्रमांक असलेले डोनर कार्ड दिले जाते.

---

### ‘यांच्या’कडून होते जनजागृती

देहांगदान जीवनदान समाजसेवी संस्था, दधिची अवयव दान समाजसेवी संस्था, आपुलकी संस्था, छत्रपती फाउंडेशन यांच्या माध्यमातून जनजागृती करण्यात येत असते. मेडिकल कॉलेज, हॉस्पिटले केली जाते.